

# संस्थेची उदिष्टे

**भारतीय युवक कल्याण व व्यायाम केंद्र** ही संस्था १९८० साली सार्वजनिक नाव नोंदणी कायदा १८६० व १९५० नुसार पंजीबंध्द झालेली संस्था आहे. या संस्थेचा नोंदणी क्रमांक महाराष्ट्र /४२२०/पुणे असा आहे.

१) समाजात लोकशाही व सामाजिक दृष्टीकोन विकसित करणे व सामाजिक समता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

२) समाजाला शिक्षण विषयक सर्व स्तरावरील शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे. त्यासाठी विविध उपक्रम राबविणे. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, व्यवसाय व शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे.

३) युवक कल्याण विषयक उपक्रम राबविणे-व्यायाम, व्यवसाय, स्वयंरोजगार, राष्ट्रप्रेम निर्मिती उपक्रम राबविणे.

४) महिला विकास कार्यक्रम राबविणे. महिलांसाठी आर्थिक व सामाजिक जागृती उपक्रम राबविणे.

५) बालकल्याण उपक्रम राबविणे व सदृढ बालकांसाठी योग्य आहार यासाठी जागृती करणे त्यासाठी आरोग्य विकसन कार्यक्रम राबविणे.

६) सांस्कृतिकः- समाजातील आदर्श मूल्यांची जोपासना, आदर्श रुढी आणि परंपरा विकसित करणे. त्याप्रमाणे साहित्य विकासित करणे व प्रसिद्ध करणे. लोककला मधून समाजात सांस्कृतिक विकास करणे. नाट्य, नृत्य, गायन, अभिनय प्रशिक्षण व सादरीकरण कार्यक्रम आयोजित करणे.

७) समाजातील वंचित घटण्यांसाठी शिक्षण व्यवसाय, शासकिय योजना इ.च्या संधी मिळवून देणे.













# संस्थेचे उपक्रम

## १) युवक कल्याण उपक्रम

शहर पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत युवकांची शिबीरे आयोजित केली जातात. यामध्ये व्यक्तिमहत्व विकास शिबीरे नेतृत्व प्रशिक्षण शिबीरे, समाजसेवा शिबीरे आयोजित केली जातात. युवकांची चर्चा सत्रे, बैठका आयोजित केल्या जातात. युवकांसाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा मार्गदशीत उपक्रम आयोजित केले जातात.

## २) युवकांसाठी क्रीडा विकास मार्गदर्शन :

युवकामध्ये खेळाची आवड निर्माण करून देशी विदेशी खेळांचे मार्गदर्शन व स्पर्धांचे आयोजन केले जाते.

## ३) शारीरिक शिक्षण मार्गदर्शन :

जुदो, कराटे, जिमनॅस्टीक, शरीर सौष्ठव, योगा, सूर्यनमस्कार, लाठी, कुस्ती, लेझींम, डबेल्स, लांब उडी, उंच उडी, विविध धावण्याच्या शर्यती बाबत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले जातात.

## ४) व्यायाम शाळा :

सर्वच वयोगटातील स्त्री पुरुषांना शरीर सदृढ ठेऊन चांगल्या आरोग्याची सवय लागावी यासाठी संस्थेने व्यायाम शाळा सुरु केली आहे. दररोज सर्व वयोगटातील स्त्री पुरुष या व्यायाम शाळेचा लाभ घेतात.

## ५) व्यवसाय मार्गदर्शन माहिती :

दहावी, बारावी व पदवी नंतरच्या विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली जाते यामध्ये १) संगणक २) यांत्रिकी अभ्यासक्रम व वैद्यकिय अभ्यासक्रम ३) सरकारी नोकऱ्या ४) स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्त्या ५) संरक्षण दलातील नोकऱ्या इ. माहिती दिली जाते. यासाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातात.

## ६) मानस शास्त्रीय चाचण्या :

१) बुध्दिमता २) अभियोग्यता ३) आवड ४) व्यक्तिमत्व विकास ह्या मानस शास्त्रीय चाचण्या देऊन व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते.

## संस्थेचे उपक्रम

**७) व्यवसाय प्रशिक्षण :**

टेलरींग, भरतकाम, विणकाम, मेणबत्त्या तयार करणे, स्क्रीन प्रिंटींग, डी.टी.पी., व शेतीवर आधारित व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते.

**८) अन्नप्रक्रिया उद्योजकता विकास प्रशिक्षण:**

ग्रामीण शेतकऱ्यांच्या समस्या सुटाव्यात, शेतकऱ्याच्या मालाला चांगला भाव मिळावा म्हणून केंद्र शासनाच्या मदतीने अन्न प्रक्रिया उद्योजकता विकास कार्यक्रम राबविले जातात.

**९) सांस्कृतिक विकास कार्यक्रम :**

समाजातील आदर्श मुल्यांची जोपासना व्हावी सामाजिक व आर्थिक दृष्टीकोन विकसित व्हावा यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रशिक्षण व सादरी करण कार्यक्रम केंद्र शासनाच्या मदतीने राबविले जातात. यामध्ये लोकगिते, नाटक,नृत्य,गायन, कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांचे प्रशिक्षण दिले जाते.

**१०) स्वंयरोजगार :**

समाजातील बेकारी कमी व्हावी, उद्योजक दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी स्वंयरोजगार मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातात. स्वयंरोजगारांसाठी असलेल्या शासकिय कर्जयोजना यांची माहिती दिली जाते.

**११) महिला विकास कार्यक्रम :**

महिलांचे सबलीकरण करणे, महिलांसाठी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व्यवसाय विकास कार्यक्रम आयोजित केले जातात.

**१२) शिक्षण :**

प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे, वंचिंतांचे शिक्षण, साखर शाळा, म. फुले शिक्षण हमी योजना इ.वर्ग चालविले जातात.

**१३) आदिवासी विकास कार्यक्रम :**

आदिवासीसाठी, शिक्षण व्यवसाय मार्गदर्शन, स्वयंरोजगार प्रशिक्षण, सांस्कृतिक , विकसन कार्यक्रम राबविले जातात.















स्थापना : १९८८

रजि. नं. महाराष्ट्र/४२२०/पुणे

# भारतीय युवक कल्याण व व्यायाम केंद्र



गल्ली क्र.३, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२.
फोन नं. : ०२०-२५४६९१३०
मो. ९८९०६४२४४२, ९८९०११७५६३, ९७६६७७७२२८
byk_pune@reddiffmail.com